## <u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ६४/२०११ मधील निशाणी ५६ चे अर्जावरील आदेश</u>

(जिजाबाई हरिबा मोरे वगैरे विरुध्द तुकाराम गणू जाधव वगैरे)

-------------------------------------------------

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रमांक १ चे वारस क्रमांक १अ ते १क यांचे विरुद्ध नि. क्र. ४४ व ४५ वर झालेला म्हणणे नाही हा आदेश रद्द होवून मिळणेसाठी केलेला आहे. सदर अर्जावर वादींनी म्हणणे देवून आक्षेप घेतला आहे.

०२. प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. आर. एन. गलांडे व वादींतर्फे विधीज्ञ श्री. आर. एम. पाटणकर यांचा युक्तिवाद ऐकला.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर चालविण्याकरीता प्रतिवादी क्रमांक १ चे वारसांचे नि.क्र.४४ व ४५ वर त्यांना म्हणणे देण्यास संधी देणे न्यायोचित होईल. असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा जुना आहे. परंतु, प्रतिवादी याचे असे वर्तुणुकीमुळे प्रस्तुतचा दावा काम लांबणीवर पडले असल्याने सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब, पुढीलप्रमाणे आदेश –

### <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्रमांक १ चे वारस क्रमांक १अ ते १क यांचा अर्ज रक्कम रुपये ३००/- (रक्कम रुपये तिनशे फक्त) खर्च वादी यांना देणेचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक १ चे वारस क्रमांक १अ ते १क विरुध्द नि.क्र.४४ व ४५ वर विना म्हणणे चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादींनी खर्चाची पुर्तता केल्यानंतर त्यांनी दाखल केलेल्या म्हणण्यास पुढील निशाणी देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Chetna Yashwant Neware
Date: 2023.08.04 15:38:27 +0530

Digitally signed by Chetna Yashwant Neware
Date: 2023.08.04 15:40:48 +0530

ठिकाण : पाटण,जि.सातारा. ( सी.वाय.नेवारे )

दिनांक : १८.०७.२०२३. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.